पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, जानेवारी २०२१, खंड १९, अंक १०, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● उमेद

५ ● असंतोषाने धुमसणारा पाकिस्तान

१५ ● 'ट्रॅम्प'ची शताब्दी

२१ ● आव्हान लोकशाहीच्या जपणुकीचे

२५ ● आवळी-जावळी...किती ही जुळी !


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १९ (अंक १०) जानेवारी २०२१**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**

*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# उमेद

'अर्थबोधपत्रिके'च्या वाचककुटुंबातील लहानथोरांना नूतन वर्षारंभाच्या अनेकानेक मनःपूर्वक शुभेच्छा !....''नवीन वर्ष आपल्या सगळ्यांना आनंदाचे, सुखासमाधानाचे व भरभराटीचे होवो'', अशी ठरावीक शुभकामना आपण सारे एकमेकांना वर्षानुवर्षे देत असतो आणि आजवर देतही आलो. मात्र, 'कोरोना'च्या भयकारी दाहक अनुभवापायी या शुभकामनादर्शक विधानामध्ये 'आरोग्यपूर्ण' आणि 'निरामय' या दोन शब्दांचा समावेश या पुढे आपल्याला आवर्जून निरंतर करावा लागणार आहे.

'कोरोना'ने दिलेला दणका सहजासहजी तरी विस्मरणात जाणारा नाही. आपल्या आयुष्यात नव्यानेच प्रवेशलेल्या २०२१ या वर्षामध्ये तरी सारे काही लौकरात लौकर आलबेल होईल अथवा व्हावे, अशी उमेद मनाशी बाळगूनच आपल्याला नव्याने सुरुवात करावी लागेल. अवचितच उद्भवलेल्या या महामारीने मानवसमूहाला लहानमोठे असंख्य धडे शिकविले. ते पाठ आपण गिरविणार की विसरून जाणार, यांवर उद्याच्या आपल्या जगण्यातील खूप काही अवलंबून राहील. व्यक्तिगत तसेच सार्वजनिक जीवनातील स्वच्छता, सर्वसाधारण आरोग्यासंदर्भातील दक्षता, मोठ्या संख्येने आणि समूहरूपाने सुखदुःखाचे प्रसंग भोगण्याचा-अनुभवण्याचा असलेला सोस यासारख्या बाबतींत आपल्याला नवीन प्रणालींचा अवलंब करण्याखेरीज गत्यंतरच नाही. किंबहुना, 'कोरोना'च्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर जगण्यासंदर्भातील उचित अशी नवदृष्टी आपल्याला हाडीमाशी मुरवावीच लागेल. परंपरा, संस्कृती, रीतभात...यांसारख्या कोणत्याही सबबीखाली 'कोविड १९'सारख्या संसर्गजन्य विषाणूच्या वेगवान फैलावास अनुकूल परिस्थिती आयतीच उपलब्ध करून देणाऱ्या आचारविचारांचा फेरविचार करणे, ही इथून पुढील काळातील जीवनरीतीची मागणी ठरते. त्यासाठी, लोकमानसामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आणणे, ही प्राधान्याची बाब व्हावी. लोकशिक्षण ही इथे सर्वाधिक कळीची गोष्ट शाबीत होते. सार्वजनिक जीवनात आणि त्यांतल्या त्यांत खास करून राजकीय व्यवस्थेमध्ये सक्रिय असणाऱ्यांची भूमिका या संदर्भात अधिकच संवेदनशील ठरावी.



अर्थात, त्यासाठी राजकीय व्यवस्थेमध्ये बिनीला असणाऱ्या घटकांनी त्यांची विश्वासार्हता निरपवाद बुलंद बनवणे भाग आहे. कारण, आजघडीला वानवा जाणवते ती त्याच घटकाची. 'कोरोना'वर मात्रा चालणारी लस शोधून काढण्यासाठी करावे लागणारे संशोधन, लशीचे उत्पादन, तिचे वाटप व वितरण, त्यासाठी उभारावयाची यंत्रणा, प्रशासनाच्या विविध पातळ्यांवर त्या दृष्टीने घडवून आणावा लागणारा समन्वय, या सगळ्यांत खासगी कॉर्पोरेट विश्वाचा असणारा व लागणारा सहभाग...अशा अनंत बाबी देशातील राजकीय व्यवस्थेशी या ना त्या स्वरूपात आणि प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे निगडित आहेत. पुढेही त्या तशाच निगडित राहणार आहेत व राहतील. यापैकी एकाही पैलूसंदर्भात लोकमानसामध्ये किंतू उत्पन्न झाल्यास व्यवस्थेची सारीच उतरंड संशयाच्या ढगाने आच्छादिली जाईल. ते कोणाच्याच हिताचे नाही. ***(कृपया पृष्ठ क्रमांक २९ पाहावे)***

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आंतरराष्ट्रीय

# असंतोषाने धुमसणारा पाकिस्तान

ब्रिटिशांच्या वर्चस्वातून १९४७ साली भारत स्वतंत्र होत असताना एका बाजूला स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद असला तरी दुसरीकडे फाळणीचे दुःख भोगावे लागले. ब्रिटिशांचे राजकारण यशस्वी झाले. देशाची फाळणी झाली आणि पाकिस्तान हे नवे शेजारी राष्ट्र निर्माण झाले. पाकिस्तानला काश्मीर हवे होते आणि ते न मिळाल्यामुळे तेव्हापासून पाकिस्तानने भारताशी शत्रुत्व पत्करले ते अगदी आजतागायत. कधीही न भरून आलेली एक जखम पाकिस्तानच्या रूपाने फाळणीनंतर कायम ठसठसत राहिलेली आहे. काश्मीर बळकावण्यासाठी जे जे करता येणे शक्य होते ते सारे पाकिस्तानने केले. या सर्व काळात भारताने कायमच संयमाची आणि शांतता राखण्याची भूमिका घेतली. पाकिस्तानच्या कुरापती मात्र कधीही थांबल्या नाहीत. भारताच्या विरोधात पाकिस्तानने उघड युद्धही पुकारले. परंतु त्यातही पराभव पत्करावा लागला. भारत वरचढ ठरतो आहे हे लक्षात आल्यानंतर काश्मीरमध्ये छुपी घुसखोरी सुरू केली गेली. दहशतवादाला खतपाणी घातले आणि काश्मीर कायम अशांत राहील याची व्यवस्था केली गेली. सातत्याने हिंसक कारवाया करून काश्मीरमध्ये दहशतीचे वातावरण राखण्याचा प्रयत्न आजही चालूच आहे. परंतु, हे सारे काही करीत असताना पाकिस्तानचे देशांतर्गत विकासाकडे दुर्लक्ष झाले. त्याचीच परिणती म्हणून आता हा देश अनेकानेक समस्यांचा सामना करत असून सतत असंतोषाने धुमसताना दिसतो. हा देश आता अराजकाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेला आहे, असे आंतरराष्ट्रीय घटना-घडामोडींचा अभ्यास करणा-या जाणकारांचे निरीक्षण आहे.

देशांतर्गत पातळीवर अनेकानेक समस्यांनी ग्रस्त असणा-या या देशाचे भवितव्य काय असेल, असा प्रश्न आता आंतरराष्ट्रीय स्तरावर उपस्थित होऊलागला आहे. सर्वांगीण विकासाकडे प्रदीर्घ काळ दुर्लक्ष केल्याने आज पाकिस्तानात दुर्धर परिस्थिती उद्‌भवते आहे आणि त्यामुळे त्या देशाला अनेक गंभीर परिणामांना सामोरे जावे लागते आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही पातळ्यांवर पाकिस्तानची कोंडी झाल्याचे चित्र आजमितीस दिसते..



देशांतर्गत दहशतवादी कारवाया रोखण्यात पाकिस्तानला काही प्रमाणात यश मिळालेले असले तरी इतर अनेकानेक समस्यांनी हा देश ग्रासलेला आहे. बलुचिस्तान आणि सिंध प्रांतांमध्ये वाढणारा असंतोष हा या देशापुढील कळीचा मुद्दा ठरतो आहे. त्याच्याच जोडीला, 'कोविड १९' नंतर वेगाने ढासळत चाललेली अर्थव्यवस्था, वाढते कर्जबाजारीपण आणि सामान्यांच्या आवाक्याबाहेर जात असलेल्या महागाईचा उसळलेला आगडोंब या सगळ्या कात्रीमध्ये पाकिस्तान चांगलाच अडकला आहे. परिणामी विविध कारणांनी पाकिस्तानमध्ये असंतोष धुमसतो आहे. ढासळत चाललेल्या परिस्थितीतून देशाला सावरण्यामध्ये सत्ताधारी नेतृत्व अपयशी ठरत असल्याची भावना सामान्य नागरिकांच्या मनामध्ये बळकट होते आहे. या परिस्थितीचा आणि शासनाच्या नाकर्तेपणाचा नेमका फायदा विरोधी पक्ष घेत असून त्यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रानखान यांच्या विरोधात आता मोर्चेबांधणीही सुरू केली आहे. या सगळ्या गोंधळामुळे देशातील समस्यांमध्ये वाढच होत जाईल, असे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. पंतप्रधानपदी विराजमान होण्यापूर्वी इम्रानखान यांनी जितके मोठमोठे दावे केलेले होते त्या पैकी अनेक गोष्टी प्रत्यक्षात येऊ न शकल्याने अपेक्षाभंग झाल्याची भावना पाकिस्तानी नागरिकांमध्ये वाढते आहे. त्यामुळे सामान्य नागरिकही आता उघडपणाने सरकारविषयी नाराजी व्यक्त करू लागले आहेत. आपले रोजचे जगणे हे सरकार अधिकच अवघड बनवते आहे, अशी भावना नागरिकांच्या मनात मूळ धरते आहे. त्यामुळे या असंतोषाचा उद्रेक होऊन नागरिक रस्त्यावर उतरण्याची भीती अनेक राजकीय विश्लेषकांकडून वर्तवली जाते आहे.

**महागाईचा आगडोंब**

बिकट आर्थिक परिस्थितीतून जाणा-या पाकिस्तानमध्ये सध्या महागाईचा आगडोंब उसळलेला आहे. त्यामुळे सामान्य नागरिक त्रस्त झालेला आहे. तिथे जीवनावश्यक गरजेच्या वस्तूंचे दर किती तरी पटींनी वाढले आहेत. उत्पन्न तितकेच आणि गरजेच्या वस्तूंचे दर मात्र गगनाला भिडलेले अशी परिस्थिती पाकिस्तानात सर्वत्र असल्याने तेथील नागरिक हैराण झालेले आहेत. या आर्थिक संकटाचा सामना कसा करावा आणि रोजचा दिवस कसा घालवावा याची भ्रांत पाकिस्तानी नागरिकांना पडलेली आहे. अशातच 'कोरोना'नंतर रोजगार कमी झाल्याने त्याचाही मोठा फटका लोकांना बसतो आहे. कांद्याचे देशांतर्गत उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटले असून परदेशांतून कांदा आयात करावा लागतो आहे.

**सरकारचे प्रयत्न अपुरे**

वाढत्या महागाईला नियंत्रणात ठेवण्यासाठी पाकिस्तान सरकार त्याच्या परीने प्रयत्न करीत असले तरीही त्यातून मार्ग काढण्यात सरकार अपयशी ठरत असल्याची भावना लोकांच्या मनात बळावते आहे. महागाईवर अद्याप नियंत्रण मिळवता आलेले नाही. तसेच, नव्याने रोजगारनिर्मिती करण्यासंदर्भात काही ठोस पावले उचलण्यात आलेली नसल्याने 'हाताला काम नाही आणि खर्चाला पैसा नाही' अशी काहीशी अवघड परिस्थिती पाकिस्तानात निर्माण झालेली आहे. साखर, गहू, तांदूळ तसेच सर्व प्रकारच्या भाज्यासुद्धा महागलेल्या असल्याने मूलभूत गरजाही भागेनाशा झाल्या आहेत. इंधन व गॅसच्या दरांतही वाढ होत असल्याने पाकिस्तानमधील सामान्य नागरिक पार मेटाकुटीस आल्याचे चित्र पाकिस्तानी माध्यमांतून समोर येते आहे. या पार्श्वभूमीवर, आर्थिक परिस्थिती काबूत आणण्याच्या दृष्टीने प्रस्थापित सरकारचे प्रयत्न अपुरे पडत असल्याची लोकभावना वाढीस लागली आहे, असे राजकीय निरीक्षकांचे अनुमान सांगते.

**विरोधी पक्षांची एकजूट**

या ढासळत्या परिस्थितीचा राजकीय लाभ उठवून पाकिस्तानमधील सर्व विरोधी पक्षांनी सत्ताधारी सरकारविरोधात एकजूट सुरूकेली आहे. 'आम्ही सगळे लोकहितासाठी एकत्र आलो आहोत' असा दावा विरोधी पक्षांनी केला आहे. सरकारविरोधात 'पाकिस्तान डेमोक्रॅटिक मूव्हमेंट' अशी नवी आघाडी स्थापन करण्यात आली आहे. बिघडत चाललेल्या परिस्थितीचे चित्र लोकांसमोर जाहीरपणे मांडून जनक्षोभ अधिकच कसा वाढत जाईल असे प्रयत्न या विरोधी पक्षांकडून होत आहेत. सामान्य जनतेला वा-यावर सोडून दिले आहे अशी भावना लोकांमध्ये वाढीस लागली आहे. परिस्थितीचा अचूक लाभ उठवून पंतप्रधान इम्रानखान यांची राजकीय कोंडी करण्याची खेळी विरोधी पक्षांकडून खेळली जाते आहे. या सगळ्या परिस्थितीला संयमाने हाताळण्याऐवजी इम्रानखान यांनी विरोधी पक्षाच्या नेत्यांना लगाम घालण्यासाठी अटकसत्र सुरू केल्याने परिस्थिती आणखीनच चिघळते आहे. सातत्याने मोर्चे, आंदोलने आयोजित करून वाढत्या महागाईसह जनसामान्यांच्या जिव्हाळ्याचे अनेक मुद्दे पुढे करत सरकार सर्वच पातळ्यांवर अपयशी कसे ठरले आहे हाच मुद्दा विरोधकांकडून आग्रहाने मांडला जातो आहे. वाढत्या असंतोषाचा फायदा घेत राजकीय सत्तांतर कसे घडवता येईल यासाठी सगळे प्रयत्न सुरू असल्याचा अंदाज राजकीय निरीक्षक वर्तवत आहेत.



**युवकांमधील वाढती अस्वस्थता**

आजघडीस एकूणांतील जवळपास ६४ टक्के पाकिस्तानी लोकसंख्या तिशीच्या आतील आहे. या तरुणाईच्या मनातील अस्वस्थता आणखीनच वेगळी आहे. समाजातील जे वास्तव हे युवक पाहत आहेत त्यातून त्यांच्या मनातील असंतोष आणि अस्वस्थता वाढते आहे. या असंतोषाचादेखील कोणत्याही क्षणी उद्रेक होऊशकेल असा अंदाज अभ्यासकांकडून वर्तवला जातो आहे. महाविद्यालयांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांनी आपली घुसमट समाजमाध्यमांवरून व्यक्त करण्यास सुरुवात केलेली आहे. आपल्या मनातील असंतोष, सध्याचे अस्वस्थ वर्तमान आणि वाढती असहिष्णूता या सर्वांविषयी भाष्य करण्यासाठी मुक्त व्यासपीठ आपल्याला मिळत नाही, अशी भावना तरुण वर्गामध्ये वाढते आहे. या पार्श्वभूमीवर, U.S. Institute of Peace या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्वयंसेवी संस्थेने पुढाकार घेऊन पाकिस्तानमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि असंतोषाचे वातावरण दूर करण्यासाठी काही वर्षांपासून प्रयत्न सुरू केलेले आहेत. युवकांमधील वाढता असंतोष कमी करण्यासाठी स्थानिक प्रशासनाला सोबत घेत युवकांशी संवाद साधण्यावर भर दिला जातो आहे. युवकांना विश्वासात घेतले तरच ते देशाच्या विकासासाठी योगदान देऊशकतील, ही बाब संघटनेच्या प्रतिनिधींनी पाकिस्तान सरकारच्या निदर्शनास आणून दिली आहे. सामान्य नागरिकांच्या जोडीला युवकांचाही पोलिस यंत्रणेवरचा विश्वास वेगाने ढासळतो आहे. नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास पुनर्स्थापित व्हावा यासाठीदेखील प्रयत्न होणे आवश्यक आहे, अशीही सूचना U.S. Institute of Peace या संघटनेच्या वतीने करण्यात आलेली आहे.

**धार्मिक कट्टरतावादाचा अतिरेक**

असंतोषाला खतपाणी घालणा-या अनेकानेक कारणांमध्ये टोकाचा धार्मिक कट्टरतावाद हेदेखील एक महत्त्वाचे कारण असल्याचे समोर आले आहे. केवळ धार्मिक कट्टरतावादामुळे संगीताच्या अनेक कार्यक्रमांवर येणारी बंधने, त्यातून होणा-या कारवाया, लादली जाणारी बंधने यांमुळे पाकिस्तानमधील अस्वस्थता वाढते आहे. महिलांवर वेशभूषेपासून अनेक प्रकारची बंधने लादली जात आहेत. या सर्वांच्या जोडीला पाकिस्तानकडून दहशतवादाला प्रोत्साहन मिळते अशी टीका विविध देशांकडून सातत्याने होतेच आहे. त्यामुळे धार्मिक कट्टरतावाद जोपासणा-या संघटनांवर कारवाई करून त्यांना रोखण्याऐवजी सरकारच पाठिशी घालत असल्याची भावना युवकांच्या मनात वाढू लागल्याचे जाणकारांचे मत आहे.

**डागाळलेली प्रतिमा**

देशांतर्गत समस्यांतून वाढ काढताना एकीकडे अशी दमछाक होत असताना दुसरीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवरही पाकिस्तानची प्रतिमा विविध कारणांनी डागाळलेली आहे. ती दुरुस्त करण्याच्या बाबतीत सध्या तरी पाकिस्तानला अपयश येते आहे. चीनशी सलगी वाढल्यापासून अमेरिकेनेही पाकिस्तानला लक्ष्य केले आहे. पाकिस्तानच्या डोक्यावर अमेरिकेचा आजवर सतत राहिलेला वरदहस्त आता अदृश्य झाल्याची परिस्थिती आहे. चीनने पाकिस्तानशी जवळीक साधायचा प्रयत्न केल्यानंतर पाकिस्तानने चीनला सकारात्मक प्रतिसाद दिल्याने आणि ग्वादार बंदराची उभारणी करण्यासाठी चीनला मदत केल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानविषयी तीव्र नाराजी आहे. दहशतवादाला खतपाणी पुरविणारा आणि दहशतवाद्यांना आश्रय देणारा देश म्हणून पाकिस्तानची जी ओळख आंतरराष्ट्रीय समुदायात निर्माण झालेली आहे ती पाकिस्तानला अद्याप पुसता आलेली नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या Financial Action Task Force (FATF) या संघटनेने दिलेल्या अहवालातदेखील दहशतवादाची पाठराखण करीत असल्याचा ठपका पाकिस्तानवर ठेवण्यात आलेला आहे. दहशतवाद्यांना आर्थिक पुरवठा करणा-यांवर ठोस आणि योग्य कारवाई न केल्याबद्दलची शिक्षा म्हणून पाकिस्तानला या पूर्वीच 'ग्रे लिस्ट' मध्ये टाकण्यात आलेले आहे. आगामी काळातदेखील पाकिस्तानला याच यादीत ठेवण्याबाबत युरोपीय समुदाय ठाम आहे.

**चीन-पाकिस्तान 'इकॉनॉमिक कॉरिडॉर'**

पाकिस्तानची अर्थव्यवस्था डबघाईला आलेली आहे. राजकारणातील सुंदोपसुंदी कायम आहे. उद्योगधंद्यांचा म्हणावा तसा विकास झालेला नाही आणि डोक्यावरील कर्जाचा बोजा तर सातत्याने वाढतोच आहे. अडचणींच्या चक्रव्यूहात अडकलेल्या पाकिस्तानला सहकार्य करण्यासाठी चीनने चलाखीने मदतीचा हात पुढे केलेला आहे. त्या अंतर्गत China–Pakistan Economic Corridor (CPEC) साठी चीन-पाकिस्तानमध्ये सहयोग करार करण्यात आला आहे. ग्वादार बंदराचा विकास आणि इतर काही महत्त्वाकांक्षी प्रकल्प या करारानुसार पाकिस्तानमध्ये राबविले जाणार आहेत. 'चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर' चीनच्या Siyang प्रांतातून सुरू होतो आणि पाकव्याप्त काश्मीरमधील गिलगिट, बाल्टिस्तान, इस्लामाबाद, मुलतान, नवाबशाह, करारी आणि ग्वादार या मार्गाने बलुचिस्तानातील ग्वादार या बंदरापर्यंत पोहोचणार आहे. हा संपूर्ण मार्ग सुमारे अडीच हजार किलोमीटरचा आहे.



चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी पाकिस्तानला २०१५ साली भेट दिली तेव्हा या संदर्भातील अधिकृत करार झाला होता. हा करार झाला तेव्हा या प्रकल्पाचा पूर्ण खर्च अंदाजे २०० कोटी डॉलरपर्यंत जाईल असा अंदाज होता. परंतु, आता तोच खर्च वाढून तब्बल ६०० कोटी डॉलरपर्यंत जाण्याचा अंदाज वर्तवला जातो आहे. हा वाढीव आर्थिक बोजा पडल्याने पाकिस्तान दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपेल अशी भीती पाकिस्तानातील अर्थतज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. त्यातून पुन्हा ग्वादार बंदराची उभारणी करण्यामागे चीनचे मनसुबे वेगळे आहेत. युरोपातील व्यापारविस्ताराची मोठी संधी चीनला प्राप्त होणार आहे. चिनी कंपन्यांना बंदर उभारणीची मुभा देताना पाकिस्तानने ४० वर्षांसाठी करमाफी घोषित केली आहे. त्यामुळे हा निर्णयदेखील चीनच्या पथ्यावर पडला आहे. आर्थिक महासत्ता होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणा-या चीनने ग्वादार बंदराची उभारणी करणे हे महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा अंदाज आंतरराष्ट्रीय स्तरावरील जाणकार व्यक्त करीत आहेत. ग्वादार बंदराची उभारणी झाल्यानंतर चीनचा मोठा आर्थिक लाभ होईल आणि पाकिस्तानचे मात्र मोठे आर्थिक शोषण होईल, अशी धास्ती पाकिस्तानातील जाणकारांना आहे.

**बलुचिस्तानमधील स्वातंत्र्याची आस**

अनेकानेक कारणांनी धगधगणा-या विविध प्रांतांत वाहणारे स्वातंत्र्याचे वारे पाकिस्तानसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहेत. बलुचिस्तानमधील आंदोलकांनी पुन्हा बंडाचा झेंडा उभारला असून स्वातंत्र्याची मागणी सातत्याने लावून धरली आहे. प्रसंगी धाकधपटशा दाखवून किंवा अन्याय-अत्याचार करून गेली अनेक वर्षे ही मागणी दाबण्याचा प्रयत्न पाकिस्तानने केला आहे. परंतु त्यात पुरेसे यश आलेले नाही. बलुचिस्तानमधून स्वातंत्र्याचा उद्घोष आता अधिकच जोरकसपणाने होऊ लागल्याने आणि भारताने नेमका तोच मुद्दा आंतरराष्ट्रीय क्षितीजावर मुत्सद्दीपणाने लावून धरल्याने पाकिस्तानची दुहेरी कोंडी झालेली आहे.

पाकिस्तानच्या बलुचिस्तान या प्रांतामध्ये स्वातंत्र्यवाद्यांची चळवळ गेल्या ७० वर्षांपासून सुरू आहे. बलुचिस्तान हा पाकिस्तानातील सर्वांत मोठा प्रांत आहे. एकूण भूभागापैकी ४४ टक्के भूभाग एकट्या बलुचिस्तानने व्यापलेला आहे. हा भूभाग पाकिस्तानमध्ये असायलाच हवा असा तत्कालीन राजकीय धुरिणांचा आग्रह असल्याने हा प्रांत पाकिस्तानात आला. हा भूभाग आणखी महत्त्वाचा वाटण्याचे दुसरे कारण म्हणजे तेथील समृद्ध खनिजसंपत्ती. या परिसरात कोळसा, गंधक, तांबे,

बॉक्साइट आदी विविध खनिजे अतिशय विपुल प्रमाणात आहेत. अशा या बलुचिस्तानात स्वातंत्र्याचे नारे घुमत असल्याने पाकिस्तानसाठी तो अधिक काळजीचा मुद्दा ठरणे अगदी स्वाभाविकच आहे. बलुचिस्तानमधील समृद्ध साधनसंपत्तीची केवळ लूट केली जाते आणि भूमिपुत्रांच्या वाट्याला काहीही येत नाही, ही बलुचिस्तानमधील स्वातंत्र्यवाद्यांची खरी तक्रार आहे. आपल्या हक्काची जी भूमी आहे तिच्या साधनसंपत्तीवर बलुचींचाच अधिकार असायला हवा आणि तिचे आनुषंगिक लाभही त्यांनाच मिळायला हवे ही बलुची स्वातंत्र्यवाद्यांची ठाम भूमिका आहे. त्यातूनच त्यांचा पाकिस्तानविरोध वाढत राहिलेला असून त्यांना पाकिस्तानपासून स्वतंत्र व्हायचे आहे.

फाळणी होण्यापूर्वी बलुचिस्तान भारताचाच भाग होता. फाळणीनंतर बलुचिस्तान पाकिस्तानात जाणार हे उघड झाल्यानंतर बलुची नेते अहमदयारखान यांनी बलुचिस्तान स्वतंत्र करण्याची मागणी लावून धरली होती. पाकिस्तानचे मेजर जनरल अकबरखान यांनी मात्र लष्करी बळाचा वापर करून बलुचिस्तानची ही मागणी चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. हे आंदोलन तात्पुरते चिरडण्यामध्ये पाकिस्तानला तेव्हा यश आले खरे; तरीही लढवय्या वृत्तीच्या बलुचींच्या मनातील स्वातंत्र्यप्राप्तीची आस आजतागायत विझलेली नाही. तेव्हापासून सात दशके त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी संघर्ष सुरू ठेवलेला आहे. १९५८ ते १९७४ या काळामध्ये बलुचिस्तानमध्ये स्वातंत्र्यप्राप्तीच्या मागणीसाठी सातत्याने आंदोलने होत राहिली. बलुची स्वातंत्र्यवाद्यांनी पाकिस्तान सरकारच्या विरोधात उघडपणाने दंड थोपटले. पाकिस्तानी सैन्य व बलुचींच्या चकमकीही होत राहिल्या. किती तरी बलुची त्यांत मृत्यूमुखी पडले. हा संघर्ष मात्र सातत्याने वर्षानुवर्षे सुरू राहिला. १९७४ साली पाकिस्तान सरकारने बलुचींचे आव्हान कायमचे मोडून काढण्यासाठी सशस्त्र लष्करी कारवाई केली व त्यांत नऊ हजारांहून अधिक बलुचींचे शिरकाण केले.

बलुचिस्तानमधील वरिष्ठ राजकीय नेते नवाब अकबरखान बुग्ती हे या स्वातंत्र्यलढ्याचे अध्वर्यू होते. स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्याचे काम त्यांनी केले. बलुचिस्तानातील स्वातंत्र्यलढ्यात ते २००६ सालापर्यंत आघाडीवर होते. या गुंतागुंतीच्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी त्यांनी पाकिस्तानशी वाटाघाटी करण्याची तयारीही दर्शवली होती. परंतु पाकिस्तानने दगाबाजी केली आणि त्यांच्यावर हल्ला करून त्यांना एका बेसावध क्षणी ठार मारले. त्यांच्या मृत्यूनंतर काही काळ बलुचिस्तानातील स्वातंत्र्याची चळवळ मंदावली. पुढे नवाब अकबरखान बुग्ती यांचे नातू ब्रह्मदाग बुग्ती यांनी



स्वातंत्र्यलढ्याची सूत्रे हाती घेतली आणि परभूमीमध्ये वास करून बलुचिस्तानच्या मुक्तीसाठी ते प्रयत्नशील आहेत. बलुचिस्तानमधील स्वातंत्र्यवादी नेत्यांवर पाकिस्तानने अनन्वित अत्याचार केले. स्वातंत्र्याची मागणी कायमची दडपण्याचा प्रयत्न सातत्याने केला. प्रसंगी धर्मांध दहशतवादी संघटना तसेच ‘आयएसआय’ ही गुप्तहेर संघटना यांना हाताशी धरून बलुचिस्तानमध्ये आपलेच वर्चस्व राखण्याचा प्रयत्न पाकिस्तानने केला आहे. मात्र, इतके करूनही पाकिस्तानला त्यामध्ये पूर्णतः यश मिळाल्याचे दिसून येत नाही. ‘बलुचिस्तान लिबरेशन आर्मी’ आणि ‘युनायटेड बलुचिस्तान आर्मी’ या दोन सशस्त्र संघटनांच्या माध्यमातून बलुचिस्तानने स्वातंत्र्यासाठी लोकांची एकजूट करू न आक्रमक लढा उभारलेला आहे.

एकीकडे बलुचिस्तानात ही परिस्थिती तर दुसरीकडे सिंध प्रांतातदेखील पाकिस्तानची डोकेदुखी वाढू लागली आहे. बलुचिस्तानपाठोपाठ सिंध प्रांतातही स्वातंत्र्याचे नारे घुमू लागल्याने पाकिस्तानच्या अडचणींमध्ये भरच पडलेली आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांताला प्राचीन सिंधू संस्कृतीचा समृद्ध असा वारसा लाभलेला आहे. त्यामुळे या भूभागाचे आगळेवेगळे महत्त्व आहे. सिंधू संस्कृतीचे दर्शन घडवणारी मोहेंजोदडो सारखी अनेक ठिकाणे या भागात आहेत. ब्रिटिशांनी सिंध प्रांतावर १८४३ सालानंतर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. भारताला स्वातंत्र्य मिळताना झालेल्या फाळणीमध्ये सिंध प्रांत पाकिस्तानमध्ये गेला. परंतु आता या प्रांतात राहणा-या लोकांमधील असंतोष सातत्याने वाढत चाललेला आहे. त्यामुळे तिथेही स्वातंत्र्याची मागणी जोर धरीत असल्याचे चित्र आहे. सिंध प्रांतातील लोकांची मूळ भाषा सिंधी असतानाही निर्वासित मुस्लिमांच्या अधिकतर संख्येमुळे तिथे उर्दू भाषेला प्राधान्य मिळाल्याने तो अस्मितेचा मुद्दा बनला आहे. पाकिस्तानपासून वेगळे होऊन स्वतंत्र सिंध प्रांत निर्माण व्हावा अशी मागणी १९६७ सालापासूनच विविध स्थानिकांकडून होते आहे. सिंध प्रांताचे संस्थापक जी. एम. सय्यद यांच्या जयंतीनिमित्ताने तिथे अलीकडेच एका मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु, भविष्यातील धोका लक्षात घेत या भागात पाकिस्तानने जमावबंदी जाहीर केली. तो हुकूम झुगारून सिंध प्रांतातील स्वातंत्र्यवाद्यांनी मोर्चा काढला आणि स्वातंत्र्याची मागणी पुन्हा एकदा जगासमोर ठेवली. या आंदोलनाच्या दरम्यान, ‘सिंध प्रांत स्वतंत्र करावा’ अशा घोषणा देण्यात आल्या. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांची छायाचित्रे या आंदोलनात झळकल्याचे अवघ्या जगाने पाहिले.

बलुचिस्तानप्रमाणेच सिंध प्रांतामध्ये पाकिस्तानने अनन्वित अत्याचार केल्याचे अनेक दाखले इतिहासामध्ये सापडतात. सिंध प्रांतामध्ये मानवाधिकारांना तिलांजली दिली गेली आहे, असा आरोप जागतिक पातळीवरून सातत्याने केला जातो.. स्वातंत्र्याच्या मागणीचे समर्थन करणा-या अनेक लोकांचे आकस्मिक अपहरण झाल्याच्या आणि त्यांचा पुढे कधीही थांगपत्ता न लागल्याच्या शेकडो घटना इथे घडल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. ही सगळी गंभीर परिस्थिती लोकांच्या लक्षात आल्यामुळे आता सिंध प्रांतात असंतोषाचा कडेलोट होत चालला आहे.

**पाकव्याप्त काश्मीरातही अशांतता**

सुरुवातीला बलुचिस्तानपुरता मर्यादित असणारा असंतोष आता पाकिस्तानच्या अनेक भागांमध्ये पसरताना दिसतो आहे. त्यामुळे पाकिस्तानला खरी चिंता आहे ती हा पसरणारा असंतोष रोखायचा कसा याचीच. घुसखोरी करून ताब्यात राखलेल्या पाकव्याप्त काश्मीरमधील गिलगिट, बाल्टिस्तान या भागांमध्येही आता सातत्याने असंतोष वाढत असून तिथे अशांततेचे वातावरण आहे. स्वातंत्र्याच्या मागणीने या भागातही जोर पकडलेला दिसतो. तिथेही निदर्शने केली जात असून आपल्या संतप्त भावना लोक व्यक्त करताना दिसत आहेत. या खेरीज, स्वतंत्र प्रांताच्या मागणीसाठी आता संघटनात्मक पातळीवर स्थानिक लोक एकत्र येऊ लागल्याचे चित्र दिसते आहे. बलुचिस्तान, सिंध या सह देशाच्या विविध भागांत जी आंदोलने सुरू झाली त्यात सुरु वातीच्या काळात अल्पशिक्षित लोकांचा भरणा अधिक होता. परंतु, गेल्या २०-२५ वर्षांत या आंदोलनांत मध्यमवर्गही मोठ्या संख्येने उतरू लागल्याने पाकिस्तानच्या पुढ्यातील समस्या सातत्याने वाढत आहेत.

काश्मीर बळकावण्यासाठी काश्मीरचे खूप वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी त्यांनी छुप्या घुसखोरीचा आणि दहशतवादी कारवायांचा आधार घेतलेला आहे. काश्मीरमध्ये सातत्याने अशांतता कशी राहील आणि त्याच्याच जोडीला काश्मीरमधील नागरिकांच्या मनात कायमच असुरक्षिततेची भावना टिकून राहण्यासाठी ज्या कुरापती करणे शक्य आहे त्या सातत्याने पाकिस्तानकडून केल्या जात असतात. परंतु, आता तशीच अशांतता आणि असुरक्षितता पाकिस्तानला पाकव्याप्त काश्मीर आणि अन्य पाकिस्तानच्या काही प्रांतात अनुभवायला मिळत असल्याने हा देश कात्रीत सापडला असल्याचे चित्र दिसून येते आहे. सातत्याने भारताच्या विरोधात भूमिका घेऊन काश्मीरमधील नागरिकांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यांची गळचेपी होत



असल्याची ओरड पाकिस्तान सातत्याने करीत आला आहे. परंतु, तीच परिस्थिती आज पाकिस्तानच्या अंतर्गत भागांमध्ये वेगाने पसरत चाललेली असल्याने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर या प्रश्नांवर काय उत्तरे द्यायची ही पाकिस्तानची सर्व बाजूंनी मोठी कोंडी झालेली आहे.

आर्थिक घसरण, महागाईचा आगडोंब यामुळे एकीकडे मेटाकुटीला आलेल्या पाकिस्तानमधील महत्त्वाचे प्रांत फुटीरतेच्या उंबरठ्यावर येऊन उभे ठाकल्याने पाकिस्तानपुढील समस्या अधिकच बिकट बनते आहे. या असंतोषाचा केव्हाही उद्रेक होण्याची शक्यता आहे. जागतिक पातळीवरदेखील अमेरिकेसह अनेक देशांची सहानुभूती पाकिस्तान गमावून बसलेला आहे. काश्मीर मुद्यावरून कायम भारताला घेरू पाहणा-या पाकिस्तानला आता बलुचिस्तान प्रश्नावर मूग गिळून गप्प बसणे भाग पडते आहे. दहशतवाद्यांची पाठराखण करणारा आणि दहशतवादाला प्रोत्साहन देणारा देश हा पाकिस्तानवरचा ठपकाही गडद होताना दिसतो आहे. त्यामुळे या परिस्थितीतून मार्ग काढीत देशाला सावरण्याचे खूप मोठे आव्हान पाकिस्तानपुढे आहे. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

**स्मरणरंजन**

# ‘ट्रॅम्प’ची शताब्दी

बोलपटांचा जमाना आला आणि पडद्यावरच्या चित्रपटांचे रंगरूपच बदलून गेले. आता तर अत्याधुनिक ‘व्हीएफएक्स’ आणि त्रिमितीय तंत्रज्ञानांनी फारच मोठी झेप घेतलेली आहे. त्यामुळे, अशक्य वाटणा-या गोष्टीही आता पडद्यावर दिसणे सहजशक्य झालेले आहे. परंतु, चित्रपटांच्या दृष्टीने सर्वांत अवघड काळ होता तो अगदी सुरुवातीचा. चित्रपट ही कलाच त्या वेळी अगदी नव्याने अवतरलेली होती. सगळ्यांच गोष्टींची नुकती कुठे सुरूवात होती. चित्रपटांमध्ये दृश्य होती पण त्यात संवाद नव्हते. त्यामुळे फक्त हालणारी तोंडे दिसायची परंतु वाक्ये मात्र ऐकू यायची नाहीत. अशा वेळी चलचित्रांखाली उपशीर्षके देऊन ते संवाद प्रगट करावे लागत असत. त्यामुळे सगळी भिस्त असायची ती अभिनयावर. जे काही सांगायचे ते शब्दांतून नव्हे; तर अभिनयातून. अभिनेत्याची खरी कसोटी होती तिथे. मूकपटांच्या त्या काळामध्ये चित्रपटांच्या विश्वात स्वतःचा अमिट ठसा उमटवलेले जे अगदी मोजके अभिनेते होते त्यांत प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे चार्ली चॅप्लिन. अतिशय हरहुन्नरी आणि अत्युत्कृष्ट अभिनेता असलेल्या चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या विविध चित्रपटांतून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविले. लोकांची मनसोक्त करमणूक करीत असतानाच ज्वलंत सामाजिक वास्तवाला हात घालून त्याच्यावर ‘शब्दविरहित’ भाष्यही केले.

बोलका चेहरा, महामिश्कील असे डोळे, वेगवान आणि गंमतीशीर हालचाली, चालण्याची एक विशिष्ट लकब, ढगळ आणि गरीबीचे दर्शन घडवणारे कपडे, हालचालींतून निर्माण होणारा निखळ व सहज विनोद हे चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य. हसवता हसवता डोळ्यांत पाणी आणणारा अस्सल जातिवंत अभिनय ही त्यांची खासीयत होती. मूकपटांच्या जमान्यात चार्ली चॅप्लिन यांनी उत्तमोत्तम अशा चित्रपटांची भेट दिली आणि त्यामुळे रसिक प्रेक्षकांनीही या हरहुन्नरी आणि अफलातून अभिनेत्याला डोक्यावर घेतले. सर्वसामान्यांना चित्रपट पाहण्याची गोडी लागण्यामध्ये चार्ली चॅप्लिन यांच्या चित्रपटांचे योगदान मोठे होते. चार्ली चॅप्लिन यांनी अनेकानेक



उत्तमोत्तम चित्रपटांतून काम केले आणि काही चित्रपट स्वतः दिग्दर्शितही केले. सुरुवातीच्या काळात ‘द कीड्’ हा चित्रपट त्या काळी विशेष गाजला होता. या चित्रपटाला या महिन्यात १०० वर्षे पूर्ण होत आहेत.

चित्रपटांचा उदय झाला आणि मनोरंजनाचे सगळेच आयामच बदलून गेले. परंतु, मूकपट ही मोठी मर्यादा होती. पडद्यावर एकही संवाद ऐकू येत नसताना अभिनयातून प्रत्येक भाव प्रेक्षकांसमोर पोहोचवणे म्हणजे एका अर्थी दिव्यच होते. तळाशी उपशीर्षकांची जोड असली तरीदेखील जे काही पडद्यावर साकारायचे ते अभिनयातूनच ही मूकपटांची पूर्वअट होती. चार्ली चॅप्लिन यांनी मात्र सगळ्या मर्यादांवर मात करीत लोकांना चित्रपट पाहायला प्रवृत्त केले आणि निखळ मनोरंजनाचा आनंद दिला. त्या काळी प्रदर्शित होत असलेल्या मूकपटांमध्ये चार्ली चॅप्लिन यांचे चित्रपट कायमच आघाडीवर राहिले.

उत्तम अभिनेता, दिग्दर्शक आणि संगीतकार अशा तिहेरी भूमिकांमध्ये चार्ली चॅप्लिन यांनी मुक्त संचार केला आणि स्वतःचे कौशल्य वेळोवेळी सिद्धही केले. या मालिकेमध्ये चॅप्लिन यांच्या अनेक उत्तमोत्तम चित्रपटांनी आपली यशस्वी मोहर उमटवली होती. त्यामध्ये, ‘गोल्ड रश’, ‘सिटीलाइट्स’, ‘मॉडर्न टाइम्स’, ‘द सर्कस’ अशा अनेकानेक चित्रपटांनी प्रेक्षकांना खळखळून हसवलेच; परंतु तत्कालिन सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडवत अंतर्मुखही केले. याच मालिकेतील आणखी एक महत्त्वाचा चित्रपट होतो, ‘द किड्’. नाट्य आणि हास्य यांचा सुरेख मिलाफ असणारा हा चित्रपट पडद्यावर प्रदर्शित झाला आणि लोकांनी तो उचलून धरला. व्यावसायिक पातळीवर हा चित्रपट कमालीचा यशस्वी ठरला. लोकांनी या चित्रपटाला उचलून धरलेच; परंतु चार्ली चॅप्लिन यांच्या व्यावसायिक कारकिर्दीलाही या चित्रपटाने एक चांगली दिशा मिळवून दिली. या चित्रपटातील चार्ली चॅप्लिन आणि लहान मुलाची भूमिका विशेष गाजली होती. तेव्हापासून आजतागायत जातपात-लिंगभाव-वयोमानाची सारी बंधने ओलांडून हा चित्रपट वर्षानुवर्षे रसिकांची मने रिझवत आलेला आहे. ‘द किड्’ या चित्रपटातून तत्कालीन वास्तव जीवनाचे चित्र प्रभावीपणाने मांडले गेले. हा चित्रपट पडद्यावर यशस्वी होणार नाही अशी आशंकावजा भीती अनेकांनी चॅप्लिन यांना भीती बोलून दाखवली होती. प्रत्यक्षात मात्र हा चित्रपट रसिकांची वाहवा मिळवून गेला. अभिनेता, दिग्दर्शक म्हणून प्रस्थापित होण्यासाठी चार्ली चॅप्लिन यांना अतिशय खडतर अशी वाटचाल करावी लागली. एका अतिशय गरीब वस्तीमध्ये १८८९ साली त्यांचा

जन्म झाला. प्रतिकूल परिस्थितीशी सातत्याने झुंज देताना दारिद्र्याशी करावा लागणारा सामना, हलाखीचे दिवस, सततचा संघर्ष या सगळ्या गोष्टी चार्ली चॅप्लीन यांनी अतिशय जवळून पाहिलेल्या होत्या. नानाविध दाह सोसलेले होते. परिस्थितीची बहुविध तीव्रता प्रत्यक्षात अनुभवलेली होती. त्यामुळे त्या सगळ्या भोगण्याचे प्रतिबिंब नकळतपणाने त्यांच्या कलाकृतींतूनही समोर येत राहिले. चॅप्लिन यांनी अनुभवलेले बालपण, त्यांच्या वाट्याला आलेले दुःख यांच्या व्रणांपायी त्यांनी पडद्यावर साकारलेली प्रत्येक व्यक्तिरेखा जिवंत बनली आणि रसिकांच्या मनाला भिडली असे चित्रपट अभ्यासकांचे मत आहे. वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी रंगमंचावर आत्मविश्वासाने उभ्या राहिलेल्या या कलावंताने सुरु वातीला तब्बल वीस वर्षे फिरत्या नाटकांतून काम केले. त्यातून त्यांच्या अभिनयाचा पाया ख-या अर्थाने घडला.

'द ट्रॅम्प' हा चॅप्लिन यांचा मूकपट १९१५ साली प्रदर्शित झाला आणि त्यात 'ट्रॅम्प'ची मुख्य भूमिका साकारली चार्ली चॅप्लिन यांनी. ही भूमिकाच भविष्यात आपली खरी ओळख बनेल याची तेव्हा त्यांना जाणीव नव्हती. पडद्यावर दिसणारा 'ट्रॅम्प' हा काही जगावेगळा नव्हता. कामाच्या शोधात रस्त्यावर भटकणारा, फाटक्या कपड्यांत वावरणारा, दारिद्र्याशी झगडत जगणारा गरीब आणि तितकाच वेंधळा असा तरुण 'ट्रॅम्प'च्या रूपाने पहिल्यांदा जगासमोर आला. लोकांनी या 'ट्रॅम्प'ला अक्षरशः डोक्यावर घेतले. युरोपातील लोक त्या काळात जे जीवन जगत होते आणि ज्या हालअपेष्टांतून जात होते त्या जगण्याचे प्रतिबिंबच जणू त्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून पडद्यावर दिसत होते. त्यामुळे प्रेक्षकांची ती आवड लक्षात घेऊन 'ट्रॅम्प'ची भूमिका केंद्रस्थानी असणारे अनेकानेक चित्रपट पुढील काळात साकारले गेले आणि लोकांनी त्या सर्वच चित्रपटांना उचलून धरले. त्यामुळे ही भूमिका साकारणारे चार्ली चॅप्लिन लोकांच्या गळ्यातील ताईत बनले आणि या गाजलेल्या चित्रपटांनी त्यांना प्रसिद्धीच्या शिखरावर नेले.

विविध प्रकारच्या स्थित्यंतरांचा असा तो काळ होता. युरोपामध्ये अनेक घडामोडी घडत होत्या. अभिव्यक्ती स्वातंत्र्यांचा मुद्दाही जोर धरत होता. त्या काळात 'कलेसाठी कला' हा मतप्रवाह अधिक आग्रही होता. समीक्षकदेखील कोणत्याही कलाकृतीकडे त्याच परिप्रेक्ष्यातून पाहत असत. त्या पार्श्वभूमीवर, चार्ली चॅप्लिन यांचे चित्रपट हे अधिक करून मनोरंजनप्रधान आहेत, असा अनेकांचा सूर होता. परंतु, त्या चित्रपटातील बरेचसे प्रसंग विनोदाच्या माध्यमातून सामाजिक वास्तवावर परखड



भाष्य करणारे आहेत, असेही समीक्षकांचे मत होते. त्यामुळे चॅप्लिन यांचे चित्रपट निव्वळ मनोरंजनात्मक नसून त्या अव्वल दर्जाच्या कलात्मक कलाकृती असल्याचा निर्वाळा त्यांनी या काळात दिला आणि तो महत्त्वाचा ठरला. समीक्षकांनी हे चित्रपट उचलून धरल्याने ते सर्वच पातळ्यांवर यशस्वी ठरले. वस्तुतः, निखळ विनोद आणि मनोरंजन सादर करणे हे कलाविष्काराच्या कल्पनांना छेद देणारे होते. त्याच्याच जोडीने चित्रपटांतून दारिद्र्याचे दर्शन घडोघडी घडत होते. परिणामी, तत्कालीन समीक्षक आणि टीकाकारांनी चार्ली चॅप्लिन यांच्या चित्रपटांना वेगळे कलात्मक मूल्य असल्याचे मान्य करणे ही महत्त्वाची बाब मानावयास हवी.

भांडवलशाहीचा होत असलेला उदय, वेगाने सुरू झालेले यांत्रिकीकरण, त्यामध्ये भरडला जाणारा सामान्यजन, कामगारवर्गाचे शोषण, वाढत चाललेले दारिद्र्य, बकालपणा, उपासमारी हे त्या काळचे वास्तव होते. त्याचे प्रभावी आणि प्रत्ययकारी दर्शन चार्ली चॅप्लिन यांच्या चित्रपटांतून होताना दिसत होते. व्यथांची जाणीव करून देताना चार्ली चॅप्लिन यांची व्यक्तिरेखा लोकांना खळखळून हसवतही होती. त्यामुळे निखळ मनोरंजनाच्या जोडीला डोळ्यांत अंजन घालण्याचे काम चॅप्लिन यांचे चित्रपट उत्तम रीतीने करीत होते. त्यांच्या चित्रपटांचे हेच वेगळेपण ठरत होते. म्हणूनच चार्ली चॅप्लिन यांनी साकारलेला 'ट्रॅम्प' अवघ्या जगात लोकप्रिय झाला. जगभरात गाजलेल्या विविध भूमिकांमध्ये 'ट्रॅम्प'ची व्यक्तिरेखा असामान्य गणली जाऊ लागली. विशेष म्हणजे चित्रपट मूक होते आणि चॅप्लिन साकारत असलेली भूमिका मात्र कमालीची बोलकी होती. 'ट्रॅम्प'च्या भूमिकेमध्ये एका बाजूला निखळ निरागसपण होते. परिस्थितीशरणता मात्र नव्हती. या भूमिकेच्या माध्यमातून चॅप्लिन यांनी प्रहसनात्मक आणि अतिशयोक्तीपूर्ण विनोद करत लोकांना मनसोक्त हसवले आणि त्याच वेळी वास्तव परिस्थितीवर नेमकेपणाने बोट ठेवले. एकही शब्द न उच्चारता केवळ शारीरिक हालचाली आणि प्रासंगिक विनोदांच्या बळावर एक प्रभावी विश्व उभे करण्याचे श्रेय चॅप्लिन यांच्याकडे जाते.

'द किड्' या चित्रपटाने चार्ली चॅप्लिन यांना फार मोठे व्यावसायिक यश मिळवून दिले. त्यातील लहान मुलाची भूमिका विशेष गाजली आणि लोकांच्या पसंतीला उतरली. या चित्रपटातील अनेक हृदयस्पर्शी प्रसंग, त्यातील नाट्यमयता आणि प्रसंगानुरूप निर्माण होणारे विनोद हे मिश्रण लोकांना अतिशय भावले आणि त्यांनी हा चित्रपट डोक्यावर घेतला. अवघ्या ७० मिनिटांचा कालावधी असलेला हा

चित्रपट विलक्षण आशयघन होता. व्यावसायिकदृष्ट्या या चित्रपटाने दमदार कामगिरी तर केलीच; परंतु, आज १०० वर्षे लोटली तरी त्या चित्रपटातील प्रसंग रसिकांच्या स्मरणात कोरलेले जातात. या नंतरच्या काळामध्ये चार्ली चॅप्लिन यांनी 'द आयडल क्लास', 'द सर्कस', 'सिटी लाइट्स', 'मॉडर्न टाइम्स' असे अनेक उत्तमोत्तम चित्रपट काढले. या सगळ्यांमध्येच स्वप्नाळू, अर्धपोटी आणि फाटके ढगळ कपडे घालून वावरणा-या 'ट्रॅम्प'चीच छबी दिसत होती. 'सिटीलाइट्स' या चित्रपटातील अभिनयासाठी चार्ली चॅप्लिन यांना उदंड दाद मिळाली. त्या नंतर पाच वर्षांनी प्रदर्शित झालेल्या 'मॉडर्न टाइम्स' या चित्रपटाने ते पुन्हा एकवार प्रेक्षकांच्या गळ्यातील ताईत बनले. या चित्रपटात 'ट्रॅम्प' शेवटचा दिसला. हा चित्रपट म्हणजे चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनेता-दिग्दर्शक म्हणून असलेल्या कारकीर्दीचा कळसाध्याय ठरला. युरोपमध्ये पहिल्या महायुद्धानंतर यांत्रिकीकरणाचे वारे वाहायला लागले होते. त्यामध्ये माणसांना काम देण्यापेक्षा यंत्राने अधिक वेगाने कामे होऊ शकतात हा विचार त्यांद्वारे बळावू लागला होता. अनेक ठिकाणी मनुष्यबळ कमी करून यांत्रिकीकरणावर भर दिला जाऊ लागला होता. त्यामुळे कामगारवर्गांत आणि सामान्यजनांत मोठा असंतोष होता. या विषयावर अगदी चपखल भाष्य करीत यांत्रिकीकरणाच्या अतिरेकाची खिल्ली उडवणारे अनेक उत्तमोत्तम प्रसंग या चित्रपटातून सादर केलेले होते.

यातील एक प्रसंग तर विलक्षण प्रभावी ठरला. स्वतः हाताने खाण्याचेही कष्ट न घेता जर यंत्रेच घास भरवू लागली तर काय होईल, या कल्पनेभोवती गुंफलेला प्रसंग विलक्षण मनोरंजक आणि हसवणारा झालेला आहे. यंत्रांवरचे अवलंबित्व एका मर्यादेपर्यंतच कसे योग्य ठरते हा बहुमोल संदेश त्या एका प्रसंगातून अत्यंत प्रभावीपणाने देण्यात आलेला होता. हे सारे भोगणारा 'ट्रॅम्प' या सगळ्याचा केंद्रबिंदू होता. विवेक आणि मानवतावादी दृष्टिकोन न बाळगता मनुष्य केवळ तंत्रज्ञानाच्या आहारी गेला तर सारे काही बिघडून जाईल आणि अशी परिस्थितीशरणता येऊद्यायची नसेल तर अंतिमतः माणूस महत्त्वाचा आहे, हा अतिशय मोलाचा संदेश या चित्रपटाच्या माध्यमातून देण्यात आला होता. एका अजस्त्र यंत्राच्या पोटात गेल्यानंतर सामान्य माणूस कसा भरडला जाईल याचे घडवलेले दर्शन आणि यंत्रवत काम करताना येत जाणारी यांत्रिकता हे चार्ली चॅप्लिन यांनी उत्तम रीतीने सादर केले होते. त्यामुळेच आजही जगभरातील उत्तम चित्रदृश्य म्हणून या चित्रपटातील निवडक प्रसंगांचीदेखील गणना केली जाते. चॅप्लिन यांच्या विविध चित्रपटांतून दिसणारा 'ट्रॅम्प' प्रत्येक



कथाविषयाच्या केंद्रस्थानी राहिला. प्रेमाची संयत अभिव्यक्ती, दुःखावर हसून केलेली मात, दारिद्रय आणि हलाखीच्या परिस्थितीवर विनोदाचे घातलेले पांघरूण आणि अन्यायाच्या विरोधात स्वतःच्या मर्यादित क्षमतांसह दिलेली झुंज हे सारे 'ट्रॅम्प'चे गुणविशेष कायमच लोकांच्या पसंतीस उतरले. त्यामुळे 'ट्रॅम्प'ने प्रदीर्घ काळ लोकांच्या मनावर अधिराज्य केले. 'ट्रॅम्प'मुळेच चार्ली चॅप्लिन लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचले. चित्रपट दिग्दर्शित करीत असताना त्यांनीही या भूमिकेला केंद्रस्थानी ठेवूनच कथानकाची गुंफण केली. 'ट्रॅम्प' वगळता वेगळ्या धाटणीच्या अन्य भूमिका चार्ली चॅप्लिन यांच्या वाट्याला अपवादानेच आल्या. या सगळ्याला छेद दिला तो 'द ग्रेट डिक्टेटर' या चित्रपटाच्या रूपाने. कारण तिथे 'ट्रॅम्प' नव्हता. जगाला दुस-या महायुद्धाच्या खाईत लोटणा-या हिटलर यांची व्यक्तिरेखा चॅप्लिन यांनी साकारली आणि दमनकारी शक्तींच्या तीव्र उपहासाकरिता विनोद हे किती प्रभावी अस्त्र आहे हे जगाला दाखवून दिले.

'ट्रॅम्प'च्या भूमिकेव्यतिरिक्त एका वेगळ्या भूमिकेमध्ये चार्ली चॅप्लिन आल्यानंतर लोक त्यांना कसे स्वीकारतील, अशी शंका अनेकांना होती. परंतु, चॅप्लिन यांनी ती भूमिकाही लीलया पेलली. दुस-या महायुद्धाच्या काळात जर्मनीवर सत्ता गाजवणा-या, ज्यूंवर अनन्वित अत्याचार करणा-या आणि अवघे जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असणा-या हिटलरची यथेच्छ खिल्ली उड़वतानाच हुकूमशाही प्रवृत्तीवर कोरडे ओढण्याचे काम चार्ली चॅप्लिन यांनी विनोदाच्या माध्यमातून कमालीच्या प्रभावीपणे केले. त्यामुळेच हा चित्रपट म्हणजे एक मैलाचा दगड ठरला. या चित्रपटातील अनेक प्रसंग खूप गाजले. तोतया हिटलरच्या रूपात केलेले भाषण म्हणजे सामान्यांच्या मनातील सल असल्याची भावना त्या काळी व्यक्त झाली. हिटलरचे विक्षिप्तपणही चार्ली चॅप्लिन यांनी नेमकेपणाने टिपले. समीक्षकांनीही या चित्रपटाला भरभरून दाद दिली. हाही चित्रपट रसिकांच्या पसंतीला उतरला.

आज १०० वर्षे लोटली तरीदेखील चार्ली चॅप्लिन यांनी चित्रपट रसिकांच्या मनावर केलेले गारूड तसेच अक्षय आहे. चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या हयातीत एकूण सुमारे १०० चित्रपट बनवले. त्यातील बहुतांश चित्रपट मूकपटच होते. पण अभिजात कलाकृती काळाच्या बंधनांवर मात करून टिकून राहतात. आज तंत्रज्ञानाने कितीही मोठी मजल मारलेली असली तरीही चार्ली चॅप्लिन यांचे मूकपट आपल्याला खिळवून ठेवतात आणि निखळ मनोरंजनाचा आनंद देतात. शताब्दी साजरी करणा-या 'ट्रॅम्प'चे स्मरण उचित ठरते ते यासाठीच. ■■

आंतरराष्ट्रीय

# आव्हान लोकशाहीच्या जपणुकीचे

देशात राहणा-या जनतेच्या हक्कांची जपणूक व्हावी आणि व्यक्तीस्वातंत्र्याचा हक्क अबाधित राहावा म्हणून आजमितीला जगातील अनेक देशांनी लोकशाही व्यवस्थेचा अंगीकार केलेला आहे. मात्र, आजघडीला भारताच्या आसपास असणा-या काही देशांतील लोकशाही व्यवस्था विविध कारणांमुळे धोक्यात आली असल्याचे चित्र दिसते आहे. या देशांतील विविध घडामोडी आणि तेथील स्थित्यंतरे पाहता तिथे लोकशाही व्यवस्थेची जपणूक होणार कशी हे एक मोठेच आव्हान या देशांच्या पुढ्यात उभे ठाकलले आहे.

लोकशाही व्यवस्था काल-परवा सुरू झालेली नाही. दीर्घकाळापासून चालत आलेली अशी ही व्यवस्था आहे. प्राचीन काळी ग्रीसमधील अनेक नगरराज्यांमध्ये लोकशाही व्यवस्था प्रस्थापित करण्याच्या दिशेने काही पूरक आणि महत्त्वाचे असे प्रयोग झाल्याचे दाखले इतिहासात सापडतात. त्या काळी राज्यातील महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी नागरिकांची समिती स्थापन करून त्यांनीच विचारविमर्श करून निर्णय घेण्याची तरतूद केलेली होती. तसेच गुंतागुंतीच्या अनेक प्रश्नांचा न्यायनिवाडा लोकांनी बहुमताने करावा, असे लोकशाहीला पूरक ठरणारे प्रयोग तेव्हा झाल्याचे आढळते. 'ॲरिस्टॉटल' आणि 'प्लेटो' या तत्कालीन विचारवंतांनीदेखील हुकूमशाही किंवा एकाधिकारशाहीपेक्षा लोकशाही व्यवस्थाच अधिक महत्त्वाची आहे असे प्रतिपादन केले होते. सत्तेचा उपयोग लोकहितार्थ केला जावा आणि नागरिकही प्रत्यक्ष राज्यकारभारात सहभागी झालेले असावेत, या मतांचा आग्रह त्यांनी धरला. रोममध्येदेखील याच धर्तीवर लोकशाहीचा पुरस्कार करणारे काही प्रयोग झाल्याचे दिसते. रोमन सत्ताधिशांनी राज्यामध्ये अधिसभा स्थापन केली होती. लोकनियुक्त सभासदांच्या मदतीने आजच्या संसदेप्रमाणेच या अधिसभेचे कामकाज चालत असे. भारतातही विविध प्रांतांमध्ये लोकशाहीचे प्रयोग झाले असल्याचा निर्वाळा इतिहासाचे अभ्यासक देतात. वेदोत्तर काळापासून ते गुप्त काळापर्यंत बिहार, सिंधू आणि देशाच्या वायव्य प्रांतात 'राजाविहरित



गणराज्ये' प्रस्थापित झालेली होती. त्यामध्ये विविध सभासदांकडून प्रस्ताव मागवणे, गुप्त मतदान पद्धती राबवणे अशा लोकशाहीला पूरक असणा-या बाबी अस्तित्वात आलेल्या होत्या. पुढे मात्र त्यात प्रदीर्घ खंड पडला आणि साम्राज्यवादी राजेशाही टिकून राहिली. 'लोकशाहीची जननी' म्हणून ओळखल्या जाणा-या इंग्लंडमध्ये लोकशाहीची नव्याने पुनर्स्थापना झाली. त्या नंतर हळूहळू विविध देशांनी लोकशाही व्यवस्थेचा अंगीकार केला. देशांतर्गत परिस्थिती लक्षात घेत राज्यघटना तयार केल्या आणि लोकशाही व्यवस्था प्रस्थापित केली. चीन, उत्तर कोरिया, युगांडा अशा काही देशांमध्ये आजही लोकशाही व्यवस्था अस्तित्वात नाही. अशा देशांत लोकांच्या हक्कांवर किती गदा येते हे पाहिल्यानंतर लोकांच्या हक्क आणि स्वातंत्र्यांच्या जपणुकीसाठी लोकशाही व्यवस्था किती महत्त्वाची आहे, हे ध्यानात येते.

'लोकांनी, लोकांचे, लोकांसाठी चालवलेले राज्य' ही अब्राहम लिंकन यांनी केलेली लोकशाहीची व्याख्या प्रचलित आहे. लोकशाही व्यवस्थेचे वर्णन करताना 'बहुमताचे राज्य' असेही केले जाते. लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे. राज्यघटना आणि राज्यव्यवस्था याद्वारे लोकशाही प्रस्थापित होत असते, असे अभ्यासकांचे मत आहे. समाजातील लोकांच्या हक्क व अधिकारांचे रक्षण व्हावे आणि स्वातंत्र्यपूर्ण वातावरणात त्यांना जीवन जगता यावे या भूमिकेतून अनेक देशांत लोकशाही व्यवस्था प्रस्थापित झालेली आहे. अनेक देशांमध्ये लोकशाही व्यवस्था उत्तम रीतीने रुजलेलीदेखील आहे. परंतु, भारताशेजारील काही देशांतील स्थित्यंतरे आणि सातत्यपूर्ण घडामोडी लक्षात घेता तेथील लोकशाही व्यवस्थेच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या लोकशाही व्यवस्थेची जपणूक करायची कशी हे एक मोठेच आव्हान या देशांच्या पुढ्यात आहे.

सर्वांत ज्वलंत उदाहरण आहे ते भारताचा शेजारी देश असलेल्या म्यानमारचे. कारण तेथील लष्कराने प्रस्थापित लोकशाही व्यवस्थेला उलथवून टाकले आहे आणि सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली आहेत. जगभरात लोकशाहीवादी नेत्या म्हणून ओळखल्या जाणा-या Aung San Suu Kyi यांच्यासह म्यानमारचे राष्ट्रपती Win Myint आणि सर्व प्रमुख राजकीय नेत्यांना लष्कराने अटक केली आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकांच्या दरम्यान सरकार आणि लष्कर यांच्यामध्ये तणाव वाढला होता. त्या नंतर लष्कराने हा आक्रमक पवित्रा घेतला आहे. निवडणुकीनंतर Aung San Suu Kyi यांच्या पक्षाला संपूर्ण बहुमत मिळालेले असतानादेखील निवडणूक प्रक्रियेवर

आक्षेप घेऊन लष्कराने सरकारच्या सर्व प्रमुख नेत्यांवर अंकुश प्रस्थापित केला आहे. म्यानमारचा पूर्वेतिहास लक्षात घेतला तर, या देशात लोकशाहीची पुनर्स्थापना व्हावी म्हणून Aung San Suu Kyi यांनी लढा उभारला होता. म्यानमारमध्ये लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला होता. अनेक वर्षे त्यांना नजरकैदेत ठेवले होते. अखेरिस, २०१५ साली देशाच्या पंतप्रधानपदी त्या विराजमान झाल्या. लोकशाही मूल्यांची जपणूक करण्यासाठी त्यांनी जो संघर्ष केला त्यासाठी त्यांना 'नोबेल' पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. मात्र, याच म्यानमारमध्ये २०१७ सालापासून रोहिंग्या मुस्लिमांवर हल्ले सुरू झाले आणि परिस्थिती चिघळत गेली. म्यानमारमधून सात लाखांहून अधिक मुस्लिमांना देश सोडून बांगलादेशात विस्थापित व्हावे लागले. चीन व भारतात हे मुस्लिम बांगलादेशातून घुसू लागल्याने हा प्रश्न अधिकच बिकट बनत गेला. म्यानमारमधील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला. रोहिंग्या मुस्लिमांना पुन्हा मायदेशात परत घेण्यासाठी म्यानमारवर आंतरराष्ट्रीय दबाव वाढत गेला. तरीही अलीकडेच झालेल्या निवडणुकांमध्ये 'नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी' (एनएलडी) या Aung San Suu Kyi यांच्या पक्षाने पुन्हा एकदा स्पष्ट बहुमत प्राप्त केले. मात्र, लष्कराला या निवडणुकाच मान्य नाहीत. निवडणूक प्रक्रिया निकोप, पारदर्शक पद्धतीने राबवली गेली नसल्याचा लष्कराचा दावा आहे. लष्कराने सत्ता उलथवून आपल्या ताब्यात घेतली असली तरी आता जनतेच्या असंतोषाला सामोरे जावे लागते आहे. त्यामुळे या देशात अराजकाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. या सगळ्यांतून मार्ग काढून पुन्हा तिथे लोकशाही कशी प्रस्थापित होणार हे एक मोठे प्रश्नचिन्ह आहे.

भारताचा दुसरा शेजारी असणा-या नेपाळमध्येदेखील अशीच अस्थिर आणि असंतोषाची परिस्थिती आहे. नेपाळचे पंतप्रधान K. P. Sharma Oli यांनी अलीकडेच संसद विसर्जित करून पुन्हा निवडणूका घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे देशामध्ये असंतोषाची परिस्थिती उद्‌भवली आहे. या निर्णयामुळे स्वपक्षीय आणि विरोधक असे सगळेच संतप्त झालेले आहेत. नेपाळमध्ये पूर्वी राजेशाही होती आणि 'हिंदू राष्ट्र' अशी या देशाची ओळख होती. मात्र, 'धर्मनिरपेक्ष राष्ट्र' ही आता नेपाळची नवी ओळख असून २०१५ साली देशाची नवी राज्यघटना तयार करण्यात आली आहे. मात्र, या नव्या लोकशाही व्यवस्थेला विरोध करणारा आणि पुन्हा राजेशाही प्रस्थापित करण्यासाठी उत्सुक व आग्रही असलेला एक मोठा वर्ग या देशात आहे.



त्या पार्श्वभूमीवर संसद विसर्जित करण्याचा निर्णय असंतोष वाढवण्यास कारणीभूत ठरलेला आहे. विरोधकांनी एकजूट करून रस्त्यावर आंदोलने सुरू केलेली आहेत तर अंतर्गत मतभेदांमुळे पक्षांतर्गत फूटीचे आव्हानही पंतप्रधान K. P. Sharma Oli यांच्या पुढे आहे. 'हिंदू राष्ट्र' म्हणून नेपाळची ओळख बनावी यासाठी अनेक गटांनी जोरकसपणाने प्रयत्न सुरू केले आहेत. लोकशाही नव्हे तर देशाचा तारणहार राजाच आहे अशी त्यांची धारणा आहे. या पार्श्वभूमीवर नेपाळमधील लोकशाही टिकवायची कशी हे आव्हान आहे.

पाकिस्तानमधील दिवसेंदिवस ढासळणारी परिस्थिती आणि विविध पातळ्यांवर अपयशी होत असणारे सरकार पाहता तिथेही असंतोषाचा विस्फोट केव्हाही होऊ शकतो. लष्कराने यापूर्वी तिथेही हस्तक्षेप करून सत्ता ताब्यात घेतल्याची उदाहरणे आहेत. पाकिस्तानमधील पूर्वेतिहास पाहता तिथे त्या अर्थाने लोकशाही व्यवस्था नीटशी रुजलेलीच नाही, असे अभ्यासकांचे मत आहे. महासत्ता म्हणून जगात मिरवणा-या अमेरिकेतही निवडणूक निकालानंतर सत्तांतर होत असताना जो काही सावळागोंधळ झाला तो प्रगल्भ लोकशाहीला साजेसा नव्हता असेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यासकांचे मत बनले. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या समर्थकांनी संसदेवर गोंधळ घातला आणि ज्यो बायडेन लोकशाही प्रक्रियेतून निवडून आलेले असताना सत्तांतर होताना त्यात अडथळे निर्माण केले त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवरून अमेरिकेवरही टीका झाली. त्यामुळे महासत्ता काय आणि लहान-लहान देश काय तेथील प्रस्थापित लोकशाही व्यवस्थेचे समोर येणारे वास्तव हे चिंताजनकच आहे. या विविध देशांतील धोक्यात आलेली लोकशाही व्यवस्था पाहता भारतातील परिस्थिती खूपच चांगली आहे, असे अभ्यासकांचे मत आहे.

भारताच्या आसपास असणा-या या लहान-मोठ्या देशांना ज्या परिस्थितीतून जावे लागते आहे ते पाहता या देशांत लोकशाही व्यवस्था टिकणार कशी हा प्रश्न उपस्थित होतो आहे. अर्थात, एकाधिकारशाही किंवा हुकूमशाही व्यवस्थेपेक्षा लोकशाही व्यवस्थेमध्येच 'लोकांचे राज्य' प्रस्थापित होऊ शकते आणि आर्थिक विषमता, शोषण यांचे प्रमाण कमी केले जाऊ शकते हे खरे असले तरी, मूलतः लोकशाही व्यवस्था टिकवायची कशी या एका मोठ्याच आव्हानापाशी हे देश येऊन ठेपलेले आहेत. त्यामुळे या देशांतील अस्थिरता, असंतोष या सर्वांवर मात करून तिथे लोकशाही मूल्यांची जपणूक होणे हीच काळाची खरी गरज आहे. ■■

## जिकडे-तिकडे

# आवळी-जावळी... किती ही जुळी !

नव्या बाळाचा जन्म ही जगातील सर्वांत सुंदर गोष्ट आहे असे मानले जाते. एका बाळाची अपेक्षा असते आणि जेव्हा जुळी मुले जन्माला येतात तेव्हा मुलाच्या जन्माचा आनंद द्विगुणित होत असतो. एकावर एक असे मिळालेले निसर्गाचे जणू वरदानच असल्याची भावना मातापित्यांच्या मनात निर्माण होत असते. परंतु, वैद्यकीय शास्त्र मात्र या सर्व बाबींकडे तटस्थपणाने पाहते. जुळी मुले होण्याच्या कारणांचा आणि परिणामांचा शोध घेते. जुळी मुले जन्माला आल्यानंतर त्या मुलांवर आणि जन्म देणा-या मातेवर काय परिणाम होतात याचाही वैद्यकशास्त्रात सखोल अभ्यास केला जातो. या पार्श्वभूमीवर, अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यास अहवालानुसार, जुळी मुले जन्माला येण्याचे प्रमाण गेल्या तीन-चार दशकांपासून जगभरात वाढते आहे. त्यामुळे त्यातून नवे प्रश्न निर्माण झालेले असून त्या विषयी संशोधक अधिक संशोधन करीत आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर विख्यात असलेल्या Human Reproduction या नियतकालिकामध्ये जुळ्या मुलांची जागतिक स्तरावरील आकडेवारी सांगणारा अभ्यास अहवाल प्रसिद्ध झालेला आहे. या अभ्यासात सहभागी संशोधकांनी जगभरातील १६५ देशांमधील २०१० ते २०१५ या कालावधीत जन्माला आलेल्या जुळ्या मुलांची आकडेवारी संकलित केली आहे आणि १९८० ते १९८५ या कालावधीत जन्माला आलेल्या जुळ्या मुलांच्या जन्मदराच्या प्रमाणाशी तिची तुलना केली आहे. त्या नुसार, गेल्या ३० वर्षांमध्ये जगभरात सर्वत्रच जुळ्या मुलांच्या जन्मदरात वाढ झालेली आहे. गेल्या तीन दशकांत आशिया खंडात जन्म घेतलेल्या जुळ्या मुलांचा जन्मदर ३२ टक्क्यांनी वाढलेला आहे तर उत्तर अमेरिकेत जुळी मुले जन्माला येण्याचे प्रमाण ७१ टक्क्यांनी वाढले आहे. अहवालातील उपलब्ध आकडेवारीनुसार, दरवर्षी १६ लाख जुळी मुले जगभरात जन्माला येतात. जन्माला येणा-या प्रत्येक ४२ लहान बाळांमागे जुळी मुले जन्म घेत असतात. तुलनात्मक आकडेवारीवरून असे लक्षात येते की, गेल्या काही वर्षांत जुळी बाळे जन्माला येण्याचे प्रमाणही वाढत चालले आहे.



**आफ्रिकेत प्रमाण सर्वाधिक**

आफ्रिकेमध्ये जुळी मुले जन्माला येण्याचे प्रमाण इतर जगाच्या तुलनेत पूर्वीपासूनच अधिक आहे आणि गेल्या ३० वर्षांत त्यांत विशेष फरक पडलेला नाही. आफ्रिकेमध्ये सातत्याने वाढत चाललेली लोकसंख्या हे त्यामागचे प्रमुख कारण असावे, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. विशेष म्हणजे, आजघडीला जगभरात जेवढी जुळे मुले जन्माला येतात, त्या पैकी ८० टक्के मुले ही आफ्रिका आणि आशिया खंडातच जन्माला येतात. मात्र, गेल्या काही वर्षांपासून हे चित्र बदलू लागले आहे. जगभरात जन्माला येणा-या एक हजार मुलांमागे जुळी मुले जन्माला येण्याचे प्रमाण प्रामुख्याने युरोप आणि उत्तर अमेरिकेमध्ये सर्वाधिक वेगाने वाढते आहे असे ही आकडेवारी दर्शवते. आफ्रिकेमध्ये सर्वाधिक जुळी मुले जन्माला येतात त्या मागेसुद्धा शास्त्रीय कारण आहे, असे अभ्यासक सांगतात. त्यांच्या मते, दोन स्त्री बीजे दोन शुक्राणूंनी एकाचवेळी फलित होतात तेव्हा द्विबीज जुळी मुले (Dizygotic twins) जन्माला येत असतात. आफ्रिकेमध्ये अशा द्विबीज जुळ्या मुलांचा जन्मदर सुरुवातीपासूनच अधिक राहिलेला आहे. त्यामुळे आफ्रिकेत पूर्वीपासून जुळ्या मुलांचे प्रमाण अधिक दिसून येते. आफ्रिकी लोक आणि इतर लोकांमधील अनुवंशिक फरकामुळे हे घडून येत असावे, असे ऑक्सफर्ड विद्यापीठातील या विषयाचे जाणकार अभ्यासक Christiaan Monden यांचे मत आहे.

आजघडीला आशिया आणि दक्षिण अमेरिकेत जुळ्या मुलांच्या जन्माचे प्रमाण अत्यल्प आहे. युरोप आणि उत्तर अमेरिकेमध्ये ते सातत्याने वाढते आहे. आफ्रिकेमध्ये मात्र त्याचे प्रमाण अन्य जगाच्या तुलनेत अधिक आहे. गरीब आणि विकसनशील देशांमध्ये जन्माला येणा-या जुळ्या बाळांचा प्रश्न अधिक गंभीर असल्याचे या अभ्यास अहवालात नमूद करण्यात आले आहे. आफ्रिकेमध्ये जुळ्या बाळांपैकी एक बाळ वर्षभराच्या आतच दगावण्याचे प्रमाण खूप मोठे आहे. या समस्येवर अद्याप आफ्रिकेला समाधानकारक तोडगा काढता आलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे जन्माला येणा-या जुळ्या मुलांचा जीव वाचवायचा कसा हे येथील मोठे आव्हान आहे. कारण दरवर्षी तिथे अशारीतीने दगावणा-या बाळांची संख्या सुमारे दोन लाख इतकी मोठी आहे. याच्या जोडीला आता श्रीमंत पाश्चिमात्य राष्ट्रांमध्येही वाढत असलेली जुळ्या मुलांची संख्या लक्षणीय आहे, असे हा अभ्यास अहवाल दर्शवितो. जगभरात जी जुळी मुले जन्माला येतात त्यामध्ये १९८० सालापासून सातत्याने वाढ होताना

दिसते आहे. सुरुवातीच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, प्रत्येक एक हजार नवजात अर्भकांमागे नऊ मुले जुळी असत. हे प्रमाण वाढून अलीकडच्या काळामध्ये हजार मुलांमागे १२ मुले जुळी जन्माला येतात इतके वाढलेले आहे. जगातील १६५ देशांपैकी ७४ देशांमध्ये गेल्या दशकभरात जुळी मुले जन्माला येण्याचे प्रमाण १० टक्क्यांनी वाढलेले आहे.

**कृत्रिम गर्भधारणा पद्धती कारणीभूत**

वैद्यकीय देखरेखीखाली केल्या जाणा-या कृत्रिम गर्भधारणांचा प्रसार १९७० सालापासून वाढत गेला. तेव्हापासूनच जुळ्या मुलांच्या जन्मदरातील जागतिक आकडेवारीमध्ये लक्षणीय असे बदल दिसून येऊ लागले असल्याचे हा अभ्यास अहवाल दर्शवतो. १९७० च्या दशकामध्ये वैद्यकीय देखरेखीखाली कृत्रिम गर्भधारणा करण्याचे प्रयोग बहुतांश विकसित देशांमध्ये वाढीस लागले. १९८० आणि १९९०च्या दशकांत हे लोण आशिया खंडात आणि लॅटीन अमेरिकेपर्यंतही पोहोचले. आयव्हीएफ, Intracytoplasmic Sperm Injection (ICSI) आणि ओव्हेरियन स्टिम्युलेशन आदी विविध प्रकारच्या नव्या तंत्रज्ञानांचा प्रसार आणि वापर विविध देशांमध्ये वाढत गेला. त्याच्याच जोडीला आता Assisted Reproductive Technology (ART) चा वापरही अनेक देशांमध्ये वेगाने वाढतो आहे. प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळेदेखील जन्म घेणा-या जुळ्या मुलांचे प्रमाण वाढत असल्याचे आता लक्षात येऊ लागले आहे. गर्भधारणेसाठी आयव्हीएफ (In Vitro Fertilization) तंत्रज्ञानाचा वाढत चाललेला वापर, मातेची प्रसूती सुलभ व्हावी म्हणून उपलब्ध होणारे नवनवीन तंत्रज्ञान आणि उशीराने होणारी बाळंतपणे या प्रमुख कारणांमुळे जुळ्या मुलांचे प्रमाण वाढते आहे, असे वैद्यकीय क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.

**उशीराने होणारी गर्भधारणा**

वयाच्या एका विशिष्ट टप्प्यावर स्वतःची कारकीर्द घडवण्यासाठी महिला अधिक प्रयत्नशील व आग्रही असतात. त्यामुळे अनेकदा कारकीर्दीची वाटचाल सुरू असताना मूल जन्माला येणे हा त्यातील एक मोठा अडथळा वाटतो. गर्भधारणेपासून ते प्रसूतीपर्यंतचा आणि त्या नंतर लहान बाळाच्या संगोपनाचा कालावधी लक्षात घेता कारकीर्दीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर महिलांना गर्भारपण नको असते. त्यामुळे आपल्या यशस्वी दिशेने होत असलेल्या वाटचालीला खीळ बसते अशी त्यांची भावना असते. म्हणून लग्न झाल्यानंतरही गर्भधारणा उशीरानेच व्हावी असे अनेक महिलांना वाटत



असते. त्याची परिणती म्हणून गर्भनिरोधाच्या साधनांचा वापर महिलांकडून अधिक होतो आहे. गर्भधारणा काही कालावधीसाठी लाबवता आली तरी देखील अशा गर्भनिरोधक साधनांचे दुष्परिणाम शरीरावर होत राहतात. अशा साधनांचा सातत्याने वापर केल्याने महिलांची प्रजननक्षमता कमी होत जाते असे अभ्यासांती समोर आलेले आहे. त्यामुळे जेव्हा प्रत्यक्षात मूल हवे असे वाटू लागते तेव्हा बाजारात उपलब्ध असणा-या नव्या कृत्रिम पर्यायांची मदत घ्यावी लागते. गर्भधारणेतील नैसर्गिकता हरवत चालली आहे आणि त्यामुळे देखील जुळी मुले जन्माला येण्याचे प्रमाण वाढत असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे निरीक्षण आहे.

**गुंतागुंतीची प्रसूती**

जुळी मुले जन्माला येण्याबाबतचे कुतूहल वैज्ञानिकांपासून ते मातेपर्यंत सगळ्यांना असले तरीही जुळ्या मुलांचे जन्माला येणे भविष्यातील अनेक समस्यांना निमंत्रण देणारे ठरत असते ही वस्तुस्थिती अभ्यासाद्वारे समोर येते आहे. जुळी मुले जन्माला येणे ही गर्भावस्थेतील अतिशय गुंतागुंतीची आणि अवघड प्रक्रिया असते. जन्माला येणारी मुले आणि जन्म देणारी माता अशा दोघांच्याही जिविताला या काळात धोका असतो. गर्भावस्थेपासून ते प्रसूतीपर्यंतच्या सर्वच टप्प्यांवर अनेक गुंतागुंतीच्या समस्या उद्भवू शकतात. प्रत्यक्षात प्रसूती होतानाही मातेची कसोटी असते. अनेकदा नऊ महिन्यांचा कालावधी पूर्ण होण्याआधीच जुळ्या मुलांचा जन्म होतो. अनेकदा जन्माला येण्यापूर्वी आईच्या पोटातच जुळ्या मुलांचा मृत्यू होण्याचे (स्टिल बर्थ) प्रमाण अधिक असते. जुळी मुले जन्माला आल्यानंतर त्यांचे वजन खूप कमी भरते. ती कुपोषित राहण्याची भीती असते. काही गंभीर आजार होऊन अनेकदा जुळी मुले दगावतात. म्हणूनच, जुळ्या मुलांच्या जन्माचे हे वाढते वैश्विक प्रमाण चिंताजनक असल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. जुळी मुले जन्माला आल्याने महिलांची प्रजननक्षमता कमी होत जाते. जुळ्या मुलांमधील रोगप्रतिकारक शक्ती कमी असते. त्यामुळे त्यांना शारीरिक व्याधीही लगेच जडतात. जुळी मुले गर्भात असताना मातांना प्रसूतीकाळात व त्या नंतरसुद्धा अनेक वैद्यकीय गुंतागुंतीच्या शारीरिक समस्यांचा सामना करावा लागतो. जुळ्या मुलांच्या जन्मामध्ये व त्या नंतर निर्माण होणारी शारीरिक गुंतागुंत दुर्लक्षित करता येण्यासारखी नाही, असे वैद्यकीय तज्ज्ञांचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे हे धोके लक्षात घेऊन जुळ्या मुलांच्या जन्मातील वाढत्या प्रमाणाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे असल्याचे प्रस्तुत अहवाल सुचवतो. ■■

*(पृष्ठ क्रमांक ४ वरून)*

कोणत्याही शासकीय धोरणाचे यशापयश अखेर सर्वसामान्य जनता त्या धोरणास कसा व किती प्रगल्भ प्रतिसाद देते त्यांवरच निर्भर राहतो. जनसामान्यांकडून सरकारच्या धोरणास दिला जाणारा प्रतिसाद, ते धोरण आखून त्याची अंमलबजावणी करणा-या शासनयंत्रणेच्या हेतूंसंदर्भात समाजमन कितपत आश्वस्त व निःशंक आहे यांवरच मोठ्या प्रमाणात निर्धारित होत असतो. खेदाची बाब अशी की 'कोरोना'चा फैलाव, या विषाणूची बाधा झालेल्यांच्या संख्येचे तपशील, संसर्गाची पडताळणी करण्यासंदर्भात कार्यरत असणारी यंत्रणा, वेगवेगळ्या यंत्रणांमार्फत केल्या जाणा-या चाचण्यांच्या निष्पत्तींबाबतचे दावे, शासकीय उपचार केंद्रांमध्ये तैनात असणा-या सुविधा...अशांसारख्या कळीच्या पैलूंसंदर्भात प्रसारित केल्या जाणा-या कथनांबाबत समाजमनाला शंका-कुशंका असल्याचे चित्र दिसते. लोकमानसामध्ये उत्पन्न होणा-या अशा विकल्पांचे निराकरण लगोलग आणि निःसंदिग्धपणे घडून आले नाही तर, 'कोरोना'शी दोन हात करण्यासाठी शासनसंस्था आखत असलेल्या धोरणविधानाची व्यावहारिक परिणामकारकता निस्तेज बनेल, हे स्वाभाविक ठरते. 'कोरोना'च्या प्रत्यक्ष प्रादुर्भावापेक्षा त्याचा बागुलबुवाच अधिककरून उभा केला जातो आहे आणि प्रचलीत राजकीय तसेच प्रशासकीय व्यवस्थेमधील काही घटकांचे हीन हितसंबंध त्याच्या मुळाशी रुजलेले आहेत, अशा प्रकारची धारणा लोकमानसामध्ये मूळ धरते आहे. असे लोकापवाद निखंदून काढण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जातील अशी उमेद बाळगावी का... या प्रश्नाच्या उत्तरावर येत्या काळातील अनेकानेक बाबी अवलंबून राहतील. ■■

**संदर्भ :**


1) www.usip.org/publications/2020/08/current-situation-pakistan

(2) https://www.charliechaplin.com/en/articles/21-overview-of-his-life

(3) https://academic.oup.com/humrep/advance-article/doi/10.1093/humrep/deab029/6168658?searchresult=1





## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

**POLITICAL SCIENCE : VOLUME 4 : INDIA ENGAGES THE WORLD, ICSSR Research Surveys and Explorations, Edited by Pradip Kumar Datta and Sanjay Palshikar, General Editor - Achin Vanaik, edited by Navnita Chadha Behera, Oxford University Press, New Delhi, India, pp. XXXV+570, First Edition published in 2013.**

एखादा विशिष्ट देश आणि वरकड जग तसेच जागतिक समुदाय यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास करण्याची एक पारंपरिक चौकट अकादमिक विश्वात बहुशः ठरून गेलेली आहे. देशादेशांमधील राजनैतिक व्यवहार तसेच देशोदेशींच्या परराष्ट्रव्यवहारविषयक धोरणांच्या चौकटीपुरताच अशा अभ्यासांचा आलेख मुख्यतः सीमित राहतो अथवा तो तसा राखलेला असतो. परंतु, १९८०-९०च्या दशकापासून घुमायला लागलेल्या जागतिकीकरणाच्या जोरदार वा-यांपायी अभ्यासाची ही पठडी अपुरी भासत असल्याबाबतचा सल या क्षेत्रातील आघाडीच्या अभ्यासकांना तसेच संशोधकांना अलीकडील काळात प्रकर्षाने जाणवू लागलेला आहे. शासनसंस्था आणि समाज अशा उभय स्तरांवर जागतिक समुदायाबरोबर भारताची साकारत असलेली गुंफण चिकित्सक भिंगाखाली धरून न्याहाळणा-या संशोधित संदर्भसाहित्याच्या विश्लेषणपूर्ण समालोचनाधारे साकारलेल्या या ग्रंथाच्या निर्मितीला तोच सल कारणभूत ठरलेला आहे. भारताच्या परराष्ट्रविषयक धोरणाचा व त्याच्या अंगभूत गुणवैशिष्ट्यांचा उहापोह यात असावा, हे त्यांमुळे स्वाभाविकच ठरते. परंतु, त्याच्याच जोडीने, भारतीय समाज, त्याचे घटकावयव आणि त्यांत सक्रिय असणा-या बहुविध व बहुस्तरीय प्रक्रिया यांचाही सांधा बाहेरच्या विश्वाशी कसा व कितपत जुळला जातो आहे, याचाही सांगोपांग धांडोळा या संदर्भात प्रस्तुत ठरतो. विश्लेषणाचा आवाका असा औरसचौरस असल्यामुळेच या विषयाचे साक्षेपी संशोधक, व्यासंगी अभ्यासक, मर्मज्ञ विशेषज्ञ अशांनाच केवळ नव्हे तर, जिज्ञासू नवागतांनाही या ग्रंथाचे अंतरंग रोचक वाटेल. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**